दि कल्याण जनता सहकारी बँक लि. (मल्टीस्टेट शेडयुल्ड बँक)
53 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

शुक्रवार, दि. 26.06.2026 रोजी बँकेची 53 वी वार्षिक सर्वसाधारण सभा नवरंग बँक्वेट हॉल, बैलबाजार, कल्याण (पश्चिम) येथे सकाळी 10.00 वाजता आयोजित करण्यात आली होती.

सकाळी ठीक 10.00 वाजता मा. व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. अनंत कुलकर्णी यांनी अध्यक्षांच्या परवानगीने जाहीर केले की, सभेस आवश्यक ती गणसंख्या नाही, सबब, सभा अर्धा तास तहकुब केली जात आहे. सदर सभा अर्ध्या तासानंतर म्हणजे सकाळी ठीक 10.30 वाजता सुरू होईल व त्या सभेस गणसंख्येचे बंधन असणार नाही. त्यानंतर, सकाळी ठीक 10.30 वाजता सभेच्या कामकाजास सुरुवात झाली. मा. व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. अनंत कुलकर्णी यांनी सर्व उपस्थितांचे हार्दिक स्वागत करुन सभेची सूचना वाचून दाखविली.

सभेच्या सुरुवातीस मा. अध्यक्ष, ॲड. सौ. संपदा कुळकर्णी यांनी सर्व सभासदांचे स्वागत केले.

यानंतर, मा. अध्यक्षांनी, बँकेचे मा. उपाध्यक्ष, श्री. महेश देशपांडे यांना श्रद्धांजलीचा ठराव मांडण्याची विनंती केली.

ठराव क्र. 1 : दुखवटयाचा ठराव -

मागील वार्षिक सर्वसाधारण सभेपासून ह्या वर्षीच्या सर्वसाधारण सभेपर्यंत ज्या मान्यवरांना व बँकेच्या सन्माननीय सभासदांना देवाज्ञा झाली त्यांना 53 वी वार्षिक सर्वसाधारण सभा श्रद्धांजली वाहत आहे.

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री - अजितदादा पवार, पद्मविभूषण ज्येष्ठ पार्श्वगायिका - आशा भोसले, ज्येष्ठ नाटककार, लेखक - गंगाराम गवाणकर, ज्येष्ठ गायक, कुमार गंधर्व यांचे परमशिष्य - चिंतामणी किरकिरे, ज्येष्ठ पर्यावरणवादी (पद्मश्री) - सालुमरदा थिमक्का, ज्येष्ठ अभिनेत्री - कामिनी कौशल, युवक क्रांती दलाचे ज्येष्ठ कार्यकर्ते - आनंद करंदीकर, मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश न्यायमूर्ती - आनंद वसंतराव पोतदार, ज्येष्ठ नेते, समाजसेवक - पन्नालाल सुराणा, ज्येष्ठ विधिज्ञ आणि मिझोरामचे माझी राज्यपाल - स्वराज कौशल, पहिला देशी सौदर्यप्रसाधनांचा लॅक्मे ब्रॅंड सुरु करणा-या - सिमॉन टाटा, सामाजिक आणि श्रमिक चळवळीचे लढवय्या नेते - डॉ. बाबा आढाव, ज्येष्ठ लेखक - अनिल कालेलकर, कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते, लोकसभेचे माजी सभापती, पंजाबचे राज्यपाल, माजी केंद्रीय गृहमंत्री, राज्य विधानसभेचे माजी अध्यक्ष - शिवराज पाटील, पद्मभूषण आंतरराष्ट्रीय ख्यातीचे भारतीय शिल्पकार - राम सुतार, महाराष्ट्राच्या माजी महसूल मंत्री - डॉ. शालिनी पाटील, ज्ञानपीठ व साहित्य अकादमी पुरस्कार विजेते ज्येष्ठ हिंदी साहित्यिक - विनोद कुमार शुक्ल, माजी जागतिक बिलियर्ड्स विजेते - मनोज कोठारी, माजी खासदार, केंद्रीय राज्यमंत्री - सुरेश कलमाडी, ज्येष्ठ पर्यावरण शास्त्रज्ञ - डॉ. माधव गाडगीळ, ज्येष्ठ नेते, माजी मंत्री - राज पुरोहित, पुण्याचे माजी महोपौर, राष्ट्रीय कॉंग्रेसचे (NCP) ज्येष्ठ नेते - शांतीलाल सुरतवाला, हार्मोनियम वादक, अनेक गायकांना सुरेल आणि सर्जनशील साथसंगत करण्यासाठी प्रसिद्ध - सीमा शिरोडकर, प्रख्यात शिवकथाकार, लेखक, इतिहास अभ्यासक - विजयराव देशमुख (प.पू.सद्गुरुदास महाराज), ज्येष्ठ अभिनेत्री - प्रविणा देशपांडे, ज्येष्ठ नेते, माजी रेल्वेमंत्री - मुकुल रॉय, ज्येष्ठ चित्रपट अभ्यासक आणि मानसशास्त्रज्ञ- डॉ. श्यामला वनारसे, ज्येष्ठ चित्रकार आणि मुखपृष्ठकार - रघुवीर कुल, संगीत अभ्यासक - मनोहर जोशी, मुंबईच्या माजी महापौर - अलका केरकर, माजी खासदार - दत्ता मेघे, ज्येष्ठ इतिहास संशोधक - डॉ. जयसिंगराव पवार, रेमंड समूहाचे माजी व्यवस्थापकीय संचालक - विजयपत सिंघानिया, ज्येष्ठ गायक - विनय मांडके, प्रख्यात शास्त्रीय गायिका आणि विदुषी - सौ. नीला भागवत, प्रख्यात छायाचित्रकार - रघु राय, प्रख्यात मानसोपचार तज्ज्ञ - डॉ. आनंद

नाडकर्णी, उत्तराखंडचे माजी मुख्यमंत्री - भुवन चंद्र खंडुरी, एशियाडमधील भारताचे पहिले सुवर्णविजेते नेमबाज - राजा रणधीर सिंग, माजी रणजीपटू - रॅंडोल्हन डॅनिअल, पद्मभूषण ज्येष्ठ गायिका - सुमन कल्याणपूर, ज्येष्ठ शास्त्रीय गायक - पंडित चंद्रकांत लिमये, ज्येष्ठ नेते - अनंतराव थोपटे, प्रसिद्ध निर्माता आणि सेन्सॉर बोर्डचे माजी अध्यक्ष - पहलाज निहलानी.

दिवंगत सभासदांची यादी

अनु. क्र.	सभासद क्र.	सभासदाचे नाव
1	50499	पाटील दिगंबर फकीरचंद
2	55252	धर्माधिकारी उषा मोहनीराज
3	8551	जठार अशोक मधुकर
4	13358	परदेशी कैलास सदाशिव
5	32516	भिडे सुधा शरद
6	33878	कल्याणकर सुनिल रामचंद्र
7	87512	गोळीपकर समिक्षा सुधीर
8	1233	दीक्षित सुभाष राजाराम
9	5796	करंजवकर राजेश बाळकृष्ण
10	12743	पिल्लई विजयन बाळकृष्णन
11	13756	तोंडलीकर दिनेश बळीराम
12	22628	भंडारी ज्ञानेश्वर रघुनाथ
13	25787	वाणी सुभाष मुरलीधर
14	26716	बेकनाळकर शरदकुमार रंगराव
15	26747	निकम सुशीला प्रकाश
16	28755	महाडे संदीप शंकर
17	29539	पिचुमुत्तू गणेश
18	48472	नाईक गोविंदराज वेंकटेश
19	50942	पाटील सुदामदेव त्रिंबक
20	59395	उबाळे गणेश दत्तात्रय
21	64272	वर्मा सावरमल दुर्गाप्रसाद
22	82955	कुलकर्णी दत्तात्रय माधव
23	35207	सोनी दिनेश प्रेमचंद्र
24	51142	मालोंडकर शुभदा प्रभाकर
25	50674	केसकर सतीश गुंडोपंत
26	12168	लोहाट बाळेश मामचंद
27	12655	दास चिन्मय अजित
28	31116	तिवारी शीला सुभाष
29	81930	सिंह रेणू मनोजसिंग

30	50580	ओकचारुशीला श्रीरंग
31	60658	ओक श्रीरंग नारायण
32	48748	आंबवणे राजेश्री राजाराम
33	42218	साळी उषा पंडित
34	25788	गोंगे रमाकांत मगन
35	54428	प्रसाद कमला लोकनाथ
36	7133	उन्निकृष्णन कुमारी
37	69523	जाधव शांताराम गोविंद
38	11978	बाथो बाबूलाल रामविशाल
39	60761	कंदरे ओमप्रकाश काजोडे
40	61505	बिर्ला मनमोहन जयनारायण
41	51185	पांडे हौशीलालप्रसाद रामउजागीर
42	24873	अनंतरामन विश्वनाथन
43	24392	खराडे अण्णासाहेब विष्णू
44	41543	निकम छाया गणपत
45	21053	जाधव किरण रत्नाकर
46	10281	राचरला सुरेश रामकृष्ण
47	4394	बोरसे सुधाकर रामचंद्र
48	30681	डोंगरे धर्मा कान्हू
49	5264	व्यवहारे उमाकांत भास्करराव
50	9629	धनानि चंद्रु नोटनदास
51	48996	सोनावणे प्रभावती हिरामण
52	14895	मराठे अपेक्षा आनंदा
53	39879	कुलकर्णी स्वाती सुभाष
54	73907	पाटील अमृत भीमराव
55	56275	लयबर रामदास भास्कर
56	51937	खैरे अनुसया प्रल्हाद
57	6222	फणसाळकर जयराम विठ्ठल
58	18180	मंडलीक दत्तात्रय विष्णू
59	21879	काळे ज्ञानेश्वर बबन
60	48518	निंबाळकर अवधूत शिवाजीराव
61	43076	रानडे श्रीकांत मोरेश्वर
62	3555	शिखरे जयंत नारायण
63	5693	बाफना ताराचंद बख्तवरमल
64	50130	दिक्षित रामचंद्र वासुदेव

65	50131	दिक्षित मंदाकिनी रामचंद्र
66	55409	घोटकर राजेंद्र धनाजी
67	59447	सरदेशपांडे तुषार गोविंद
68	39061	कदम नामदेव जयराम
69	64906	चौधरी भगवानभाई नथुभाई
70	20727	कुलकर्णी संजय गोविंद
71	2629	साळुंखे नारायण रामचंद्र
72	78813	जुलूम संजय तुकाराम
73	34800	तरमाले भास्कर यादव
74	41688	पगार कारभारी लक्ष्मण
75	51238	म्हात्रे कृष्णाबाई गोपाळ
76	15668	सरोदे सुभाष कौतिक
77	12560	तांबडे श्रीकांत छोटोपंत
78	39155	मेहेंदळे सुधाकर त्रिंबक
79	16269	उपासनी जगदीश मुरलीधर
80	33000	किरकिंडे अपर्णा चंद्रकांत
81	22762	वडगामा दमयंती मगनलाल
82	239	फाटक तिलोत्तमा वसंत
83	22719	वाणी दत्तात्रय पोपट
84	31801	जोशी प्रतिभा प्रभाकर
85	69544	घळसासी रविंद्र दामोदर
86	4195	पाटील दामोदर हरी
87	38168	पाटील पांडुरंग गोविंद
88	42476	नेने विजया मधुकर
89	4171	वाणी प्रभाकर पुंडलिक
90	46233	बागुल निंबादास नथु
91	81521	भंडारी अरुणा चंद्रकांत
92	18200	कोलते गिरधर होना
93	53187	गद्रे विद्युलता देविदास
94	35120	जोशी रामचंद्र वैजनाथ
95	19512	ठक्कर ज्योती चंदुलाल
96	7209	कदम अर्जुन धोंडीराम
97	38595	बाफना कमलेश विमलचंद
98	18187	पजवानी आशा वनमाळी
99	26147	जागडे मधुकर दिनकर

100	5309	अग्रवाल सुभाषचंद्र
101	83030	साठे माधुरी विनायक
102	19209	कदरकर विजया वसंत
103	18759	कोलते मीराबाई नामदेव
104	56271	देहेरकर वैशाली व्ही.
105	48505	तांबे लीला मधुकर
106	58348	पटेल रमेश भैलालभाई
107	20240	धवडे शुशिला दत्तात्रय
108	35617	पाटील स्मिता सुरेश
109	55634	जावळे पांडुरंग हरी

यानंतर, विषयपत्रिकेवरील विषय सभेपुढे मांडण्यात आले.

सभेतील पुढील विषय मांडण्यापूर्वी बँकेचे माजी मा. अध्यक्ष ॲड. पटवर्धन साहेब यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

मा. पटवर्धन सरांनी बँकेचे संस्थापक संचालक कै. वामनराव साठे यांच्या स्मृतीस अभिवादन केले व नवीन संचालक मंडळाचे कौतुक केले. आतापर्यंत बँकेचा व्यवसाय ज्या प्रकारे सुव्यवस्थित चालू होता तसाच यापुढेही नवीन संचालक मंडळ पुढील पाच वर्ष व्यवस्थितपणे कारभार पाहतील याबद्दल विश्वास व्यक्त केला व नवीन संचालक मंडळास शुभेच्छा दिल्या.

यानंतर मा. व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. अनंत कुलकर्णी यांनी नवीन संचालक मंडळ व बोर्ड ऑफ मॅनेजमेंटच्या सदस्यांचा परिचय करुन दिला.

मा. सभासद श्री. विश्वास जोशी यांनी विषयास सुरुवात करण्यापूर्वी सभेमध्ये केवळ बँकेचा ताळेबंद व बँकेची पुढील वाटचाल या विषयावरच चर्चा व्हावी असे सुचविले. तसेच, ज्या वैयक्तिक तक्रारी असतील त्या निवारण करण्यासाठी बँकेने वेगळी व्यवस्था केली असेल असे नमूद केले. त्यास इतर सभासदांनी टाळया वाजवून अनुमोदन दिले.

विषय क्र. 2: संचालक मंडळाने सादर केलेल्या दि. 31.03.2026 रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाच्या अहवालाची नोंद घेणे.

बँकेचे मा. अध्यक्ष, ॲड. सौ. संपदा कुळकर्णी यांनी दि. 31.03.2026 रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल सभेपुढे दृकश्राव्य माध्यमातून सादर केला.

यानंतर, बँकिंग क्षेत्रातील महत्त्वाच्या घडामोडींबद्दलचा आढावा मा. अध्यक्षांनी सभेपुढे मांडला.

बँकेच्या 53व्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये त्यांनी सर्व उपस्थित सभासदांचे बँकेच्या वतीने मन:पूर्वक स्वागत केले.

नवीन संचालक मंडळाची बिनविरोध निवड झाली आहे. नवीन संचालक मंडळ दिनांक 18 मार्च 2026 पासून कार्यान्वित झाले आहे. त्यामुळे आर्थिक वर्ष 2025-26 या कालावधीत झालेली बँकेची प्रगती ही मागील संचालक मंडळाच्या मार्गदर्शनामुळे झाली आहे. त्यामुळे आपल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित असलेल्या सर्व माजी संचालकांचे त्यांनी आभार मानले. आत्तापर्यंत

बँकेने जी प्रगती केली तशीच प्रगती यापुढेही बँक करीत राहील असे आश्वासन मा. अध्यक्षांनी दिले.

मागील संचालक मंडळाने आपल्या सीबीएस बँकिंग सॉफ्टवेअरमध्ये असलेल्या अडचणी लक्षात घेऊन टीसीएस सी एज यांचे नवीन सॉफ्टवेअर घेण्याचा निर्णय घेतला. त्याची अंमलबजावणी सुरु असून लवकरच हे सॉफ्टवेअर कार्यान्वित होईल याचा फायदा आपल्याला ग्राहक सेवा सुधारण्यासाठी व रिझर्व्ह बँकेचे व विविध लीगल एनफोर्समेंट यांचे कंप्लायन्ससाठी होणार आहे. आपल्या काही शाखांमध्ये व्यवसाय वृद्धी समाधानकारक नव्हती. विविध मार्गाने प्रयत्न करुनही व्यवसायामध्ये जास्त वाढ होत नव्हती. तसेच, भाडे व इतर खर्च यांचा विचार करुन मागील आर्थिक वर्षात आपण चार शाखा जवळच्या शाखेत विलिन करण्याचा निर्णय घेतला, ज्यामुळे आपली ऑपरेशनल कॉस्ट निश्चितच कमी होईल.

यानंतर विषयास सुरुवात करण्यापूर्वी मा. अध्यक्ष, ॲड. सौ. संपदा कुळकर्णी यांनी वैधानिक लेखापरीक्षक,मे. मुकुंद एम. चितळे ॲण्ड कं. चे भागीदार, सीए श्री. अभय कामत आणि मुख्य अंतर्गत लेखापरीक्षक, सीए श्री. अभय जोशी यांचा परिचय करुन दिला.

तसेच, बँकेचे मा. सभासद चार्टर्ड अकाउंटंट श्री. उदयजी कर्वे यांनी लेखी स्वरुपात विचारलेल्या प्रश्नांची बँकेने समाधानकारक उत्तरे दिलेली आहेत व त्यांचे समाधान झाले आहे अशी माहिती मा. अध्यक्ष यांनी दिली.

बँकेच्या आर्थिक वर्ष 2025-26 मधील प्रगतीचा आढावा घेण्यापूर्वी जागतिक पातळीवरील महत्त्वाच्या घटनांची सभेस माहिती दिली.

जागतिक स्तरावर युद्धजन्य परिस्थिती, आर्थिक वाढीबाबत निरुत्साही परिस्थिती असतानाही भारत सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे. रिझर्व्ह बँकेने आर्थिक वर्ष 2026-27 साठी जीडीपी वाढीचा 6.60% अंदाज वर्तविला आहे. तसेच, सन 2026-27 साठी महागाई दर 5.40% वर्तविला आहे. याचे कारण म्हणजे फेब्रुवारी 2026 पासून सुरु असलेले अमेरिका, इराण व इस्त्रालय यांची युद्धे. या सर्व पार्श्वभूमीवर देखील बँकेची व्यवसाय वाढ चांगली झाली आहे.

भारतीय रिझर्व्ह बँकेने दिनांक 28.11.2025 रोजी 27 मास्टर डायरेक्शन जारी करुन जुनी जवळजवळ 9445 परिपत्रके मागे घेतली. ही सर्व मास्टर डायरेक्शन संचालक मंडळात चर्चा करुन त्याचा कंप्लायन्स होईल याची दक्षता बँक घेत आहे. तसेच, एप्रिल 2026 मध्ये रिझर्व्ह बँकेने कर्ज संदर्भात नवीन परिपत्रक जाहीर केले. त्यानुसार विनातारण कर्जाची मर्यादा पाच लाखावरुन दहा लाख केली आहे. गृह कर्जाची मर्यादा देखील वाढवली आहे. ज्याचा आपल्या बँकेला कर्ज वाढीसाठी निश्चितच फायदा होईल.

रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वांनूसार संचालकांच्या कार्यकाळाबाबत परिपत्रक जारी केले आहे. त्यानुसार संचालकांचा 10 वर्षाचा सलग कालावधी पूर्ण झाल्यानंतर परत संचालक मंडळावर येण्यासाठी 3 वर्षांचा कूलिंग कालावधी पूर्ण करणे आवश्यक आहे.

यानंतर, मा. अध्यक्षांनी अहवाल वर्षातील बँकेच्या आर्थिक परिस्थितीचा आढावा सभेपुढे सादर केला.

आपल्या बँकेचे भागभांडवल रुपये 111.86 कोटी म्हणजेच मागील वर्षीच्या तुलनेत रु.3.24 कोटीने कमी झाले आहे. भागभांडवल कमी झाले असले तरीही बायलॉजमध्ये नमूद केलेली शेअर रिफंडची 10% मर्यादा आपण पाळली आहे. भागभांडवल जरी कमी झाले असले तरीही सभासदांच्या संख्येत 2528 ने वाढ होऊन सभासद संख्या 68755 झाली आहे.

राखीव व इतर निधीमध्ये रु. 21.17 कोटीने वाढ होऊन ते रु. 307.94 कोटी झाले आहे.

बँकेच्या एकूण ठेवींमध्ये रु. 178 कोटीने वाढ होऊन ठेवी रु. 3385 कोटी झाल्या आहेत.

बँकेच्या कर्जामध्ये रु. 171 कोटीने वाढ होऊन कर्जे रु. 2221 कोटी झाली आहेत.

बँकेच्या एकूण व्यवसायाने रुपये 5,606 कोटींचा टप्पा ओलांडला आहे. मिश्र व्यवसायात रु. 349 कोटीने वाढ झाली आहे.

बँकेच्या निव्वळ नफ्यामध्ये मागील वर्षाच्या तुलनेत रु. 6.54 कोटीने वाढ झाली आहे.

बँक ECBA (म्हणजेच पूर्वीचे FSWM) कॅटेगरीत आली असून, त्याचा फायदा आपल्याला शाखा विस्तारासाठी होणार आहे. बँकेच्या या प्रगतीत मागील संचालक मंडळाचा खुप मोठा वाटा आहे त्यासाठी मा. अध्यक्षांनी त्यांचे आभार मानले.

कर्मचारी उत्पादकता या मध्ये रु. 1 कोटीने वाढ होऊन रु. 10.12 कोटी झाली आहे.

रिझर्व्ह बँकेच्या नियमांनुसार, भांडवल पर्याप्तता म्हणजेच CRAR 12% ठेवणे आवश्यक असून, आपल्या बँकेने CRAR 13.34% ठेवला आहे.

अनुत्पादित कर्जामध्ये देखील रिकव्हरी झाल्यामुळे Gross NPA 5.46% व Net NPA 2.22% झाले आहे. निर्लेखित केलेल्या कर्जामध्ये देखील उल्लेखनीय वसुली केली आहे. त्यामुळे, बँकेचा Provision Coverage Ratio 51% वरुन 61% वर पोहोचला आहे. बँकेच्या आर्थिक स्थितीचा आलेख मांडण्यात आला.

मागील आर्थिक वर्षाप्रमाणेच या वर्षी देखील ग्राहक व सभासदांच्या सहकार्याने आपण तीन महिन्यातच LTSB मध्ये रुपये 25 कोटी जमा करु शकलो आहोत असे मा. अध्यक्षांनी नमूद केले.

बँकेसाठी विविध विमा कंपन्या कॉर्पोरेट एजंट म्हणून कार्यरत आहेत. बँकेच्या ग्राहकांना सर्वोत्तम कंपन्यांच्या विविध प्रकारच्या सेवांचा लाभ एकाच ठिकाणी उपलब्ध होत आहे. विमा व्यवसायाची माहिती देताना अध्यक्षांनी सांगितले की, बँकेच्या ग्राहकांना सर्वोत्तम कंपन्यांच्या विविध प्रकारच्या विमा सेवांचा लाभ एकाच ठिकाणी घेता यावा याकरीता बँकेने मे. कोटक महिंद्रा लाईफ इन्शुरन्स कंपनी लि. व एस.बी.आय.लाईफ इन्शुरन्स कंपनी लि. यांचेबरोबर जीवन विमा व्यवसायाकरिता, इतर सर्वसाधारण विम्याकरिता दि न्यू इंडिया अ‍ॅश्युरन्स कंपनी लि. तसेच, आय.सी.आय.सी.आय. लोम्बार्ड जनरल इन्शुरन्स कंपनी लि. यांचे बरोबर करार केला आहे. अहवाल वर्षात, बँकेने आरोग्य विमा क्षेत्रातही प्रवेश केला आहे. बँकेने कॉर्पोरेट एजंट म्हणून स्टार हेल्थ अँड अलाईड इन्शुरन्स कंपनी लि. आणि केअर हेल्थ इन्शुरन्स कंपनी लि. यांच्याशी करार केला आहे. आता ग्राहक एकाच ठिकाणी सर्व प्रकारच्या विमा सेवांचा लाभ घेऊ शकतात.

विम्याच्या या दोन्ही क्षेत्रामध्ये बँकेने सातत्याने व्यवसाय वृध्दी नोंदविलेली आहे. जीवन विम्यापोटी 973 विमा पॉलिसींतून रु. 714.04 लाख रकमेचे विमा हप्ते, इतर सर्वसाधारण विम्यापोटी 2019 पॉलिसींतून रु.76.80 लाख इतक्या रक्कमेचे विमा हप्ते आणि आरोग्य विम्यपोटी 198 विमा पॉलिसींतून रु. 36.65 लाख रकमेचे विमा हप्ते बँकेने अहवाल वर्षात जमा केले.

बँकेची स्थापना करणा-या संस्थापक संचालकांप्रती बँक नेहमीच कृतज्ञ राहू इच्छिते. यासाठी छोटासा प्रयत्न म्हणून बँकेचे संस्थापक संचालक, कै. वामनराव साठे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ, बँकेच्या 53व्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून दिनांक 20 डिसेंबर 2025 रोजी कल्याण येथे बँकेचे संस्थापक संचालक कै. वामनराव साठे स्मृतीव्याख्यान आयोजित करण्यात आले होते. सदर कार्यक्रमासाठी प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ मा. डॉ. विनायक गोविलकर, यांची वक्ता म्हणून उपस्थिती लाभली. सदर व्याख्यानासाठीचा विषय “विकासाची भारतीय संकल्पना” हा होता.

दि.3 जानेवारी, 2026 रोजी पुणे क्षेत्रीय कार्यालय येथील प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. या प्रशिक्षण केंद्रास बँकेचे संस्थापक संचालक व माजी अध्यक्ष कै. प्रा. अशोक प्रधान यांचे नाव देण्यात आले. सदर प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन मा. श्री. संतोष दाभाडे आपले सभासद व तळेगावचे लोकनियुक्त नगराध्यक्ष व श्री. महेशराव कर्पे, रा.स्व.संघ - पश्चिम महाराष्ट्र - प्रांत सहकार्यवाह यांच्या हस्ते झाले.

पुढे मा. अध्यक्षांनी सांगितले की, दिनांक 13.04.2026 रोजी हडपसर शाखा नजीकच्या नवीन जागेमध्ये स्थलांतरित करण्यात आली.

इयत्ता 10 वी, 12 वी व शिष्यवृत्ती परीक्षांमध्ये यश मिळवणा-या सभासदांच्या पाल्यांना विद्यार्थी प्राविण्य पुरस्कार प्रदान करण्यात आले. याबरोबरच, बँक **"भारताचार्य वैद्य पुरस्कार"** आणि **"डॉ. आनंदीबाई जोशी"** पुरस्कार असे दोन विशेष पुरस्कार प्रदान करते. सन 2025-26 मध्ये हे पुरस्कार प्रदान केले आहेत.

यानंतर, मा. अध्यक्षांनी अहवाल वर्षात बँकेला मिळालेल्या पुरस्कारांची माहिती सभेस दिली.

बँकेला वेळोवेळी उत्कृष्ट कामगिरीबद्दल विविध संस्थांकडून पुरस्कार देऊन गौरवण्यात आले आहे. ही बँकेसाठी अभिमानाची आणि सन्मानाची बाब आहे. अहवाल वर्षामध्ये बँकेला पुढीलप्रमाणे पुरस्कार मिळाले आहेत.

1. All India Urban Co-operative Banking Summit & Awards 2026 यांच्यातर्फे **'Best Customer Service Initiative'** साठी बँकेला सन्मानित करण्यात आले आहे.
2. Frontiers in Co-operative Banking Awards (FCBA) यांचेतर्फे 2025 सालाकरीता **'Best Product Initiative'** साठी बँकेला सन्मानित करण्यात आले.
3. Computer Society of India यांच्याकडून **'Top CISO of the Year'** आणि **'Outstanding Cyber Security Team in Co-operative Sector'** साठी बँकेला सन्मानित करण्यात आले.

मा. अध्यक्षांनी सर्व सभासदांना सायबर गुन्ह्यासंदर्भात सजग राहण्याचे आवाहन केले.

त्यानंतर, मा. अध्यक्ष, ॲड.सौ. संपदा कुळकर्णी मॅडम यांनी ठराव मांडण्यापूर्वी सभासद श्री. अरुण शिंपी (चित्ते) यांनी प्रश्न विचारला की, मॅडमनी आर्थिक वर्षातील सादर केलेला आढावा अहवालानुसार वाचून दाखविला असता तर अधिक चांगल्याप्रकारे समजला असता. तसेच, ज्या चार शाखा विलीन करण्यात आल्या त्या कोणत्या उद्देशामुळे दुस-या शाखेत विलीन करण्यात आल्या त्याची माहिती सभेस मिळावी.

त्यास उत्तर देताना मा. अध्यक्षांनी सांगितले की, मागील संचालक मंडळाने या चार शाखा बंद करताना स्वतंत्र कमिटी नेमलेली होती. सदर शाखांमधील व्यवसाय वृद्धीचे प्रमाण समाधानकारक नसल्याने तसेच, इतर ऑपरेशनल कॉस्ट जास्त असल्याने व आर्थिक भार कमी करण्यासाठी सदर शाखा नजीकच्या शाखेत विलीन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

मा. अध्यक्षांनी आर्थिक वर्षात बँकेने केलेल्या प्रगतीचा अहवाल सभेपुढे मांडला. हे सर्व सभासद / खातेदार या सर्वांच्या सहकार्यामुळे साध्य झाले असे सहकार्य आपल्याकडून भविष्यात मिळेल तसेच बँकेची उत्तरोत्तर प्रगती होईल अशी ग्वाही संचालक मंडळाच्या वतीने मा. अध्यक्षांनी दिली. त्यानंतर, मा. अध्यक्षांनी ठराव क्र. 2 सभेसमोर मांडला.

ठराव क्र. 2 : मा. संचालक मंडळाने तयार केलेला दि. 31.03.2026 रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल, **मा. अध्यक्ष, ॲड. सौ. संपदा कुळकर्णी** यांनी सभेपुढे मांडला. त्याची ही सर्वसाधारण सभा नोंद घेत आहे.

सूचक : नाव : श्री. मोटवानी मनोज कनैयालाल सभासद क्र. : 82687
अनुमोदक : नाव : श्री. श्रीकांत वामन जोशी सभासद क्र. : 1771
ठराव सर्वानुमते मंजूर.

त्यानंतर, मा. अध्यक्षांनी, मा. संचालक, सीए सौरभ जोशी यांना पुढील ठराव मांडण्यास सांगितले.

विषय क्र. 3 : वैधानिक लेखापरीक्षकांनी तपासलेला दि. 31.03.2026 रोजीचा ताळेबंद, नफा-तोटा पत्रक आणि लेखापरीक्षण अहवाल स्वीकृत करणे तसेच मागील वर्षाच्या वैधानिक लेखापरीक्षणाच्या दोषदुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.

मा. संचालक, सीए सौरभ जोशी यांनी विषयांस सुरुवात करण्यापूर्वी अहवालातील पान क्र. 32 ते 39 वर दि. 31 मार्च 2026 चा ताळेबंद आणि पान क्र. 40 व 41 वर दि. 31 मार्च 2026 अखेर संपलेल्या वर्षाचे नफा तोटा पत्रक आहे असे सभासदांच्या माहितीकरिता सांगितले. मा. श्री. जोशी यांनी पुढे नमूद केले की, सन 2025-26 या आर्थिक वर्षात बँकेने जे Key Indicator आहेत त्यात सकारात्मक वाढ केली आहे. तसेच, बँकेने ठरविलेले मिश्र व्यवसायाचे उद्दिष्ट साध्य केले आहे व FSWM मध्ये वर्ग होण्यासाठीचे सर्व निकष बँकेने पूर्ण केले आहेत. त्याचा फायदा बँकेच्या शाखा विस्तारासाठी तसेच Door to Door बँकिंग सेवा देण्याकरिता होईल. अशाप्रकारे सर्व दृष्टिने यशस्वी वर्षाचे नफा-तोटा पत्रक सादर करण्यास आनंद होत आहे असे मा.श्री.जोशी यांनी सांगितले.
यानंतर कर्जावरील व गुंतवणुकीवरील व्याज ही दोन मुख्य उत्पन्नाची साधने आहेत असे सांगितले. सन 2025-26 या आर्थिक वर्षात कर्जावरील व्याज हे रु. 197.84 कोटी राहिले. मार्केटमधील स्पर्धेत टिकून रहाण्यासाठी व रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी केलेल्या व्याजदरामधील कपातीमुळे मागील वर्षाच्या तुलनेत कर्जावरील व्याजात रु. 4.05 कोटीने घट झालेली दिसत आहे.

कर्जावरील उत्पन्न (Yield) मागील वर्षी 9.85% वरुन 19 BPS ने कमी होऊन यंदाचे वर्षी 9.66% झाले आहे.

कर्जावरील उत्पन्न (Yield) कमी झाल्याकारणाने व्याजात रु. 4.05 कोटीची घट झालेली दिसत आहे.

पुढे मा. श्री. जोशी यांनी सांगितले की, गुंतवणुकीवरील उत्पन्नामध्ये 19 BPS ने वाढ होऊन गुंतवणुकीवरील व्याजामध्ये सन 2025-26 मध्ये रु. 2.75 कोटीने वाढ झाली आहे.

सन 2025-26 मध्ये ठेवींवरील व्याज रु. 166.40 कोटी दिले आहे. त्यामध्ये मागील वर्षाच्या तुलनेत रु. 1.89 कोटीने वाढ झाली आहे. एकूण ठेवींमध्ये रु. 178.03 कोटीने वाढ झाली असल्याने नकारात्मक परिणाम ठेवींवरील व्याज वाढीवर दिसत आहे. तसेच, LTSB व्याज वाढीची कारणे श्री. जोशी यांनी नमूद केली. Industrial Norms नुसार नेट इंटरेस्ट मार्जिन (NIM) 3% पेक्षा जास्त असल्यास तो उत्तम समजला जातो. आपल्या बँकेचा नेट इंटरेस्ट मार्जिन (NIM) हा सन 2025-26 या आर्थिक वर्षाकरिता 3.08% इतका आहे. याबरोबरच इतर जमा खर्चाचा सविस्तर तपशील श्री. जोशी सर यांनी सभेपुढे सादर केला. तसेच, बँकेचा नफा सन 2025-26 करिता रु. 6.54 कोटीने वाढून रु. 16.64 कोटी झाला असल्याचे सांगितले.

ठराव क्र.3: वैधानिक लेखापरीक्षक मे. मुकुंद एम. चितळे ॲण्ड कंपनी यांनी तपासलेला दि. 31.03.2026 रोजीचा ताळेबंद, तसेच दि. 31.03.2026 अखेरचे नफातोटा पत्रक आणि लेखापरीक्षण अहवाल **मा. संचालक, सीए सौरभ जोशी** यांनी सभेपुढे मांडला व समजावून सांगितला. त्यास ही सभा स्वीकृत करीत आहे.

तसेच 2024-25 या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरीक्षणाचा दोषदुरुस्ती अहवाल **मा. संचालक, सीए सौरभ जोशी** यांनी सभेपुढे मांडला. त्याची ही सभा नोंद घेत आहे.

सूचक :	नाव : श्री. किशनानी भगवानदास नारायणदास	सभासद क्र. 86482
अनुमोदक :	नाव : श्री. विद्याधर नरहर वाणी	सभासद क्र. 83575

ठराव सर्वानुमते मंजूर.

त्यानंतर, मा. अध्यक्षांनी, मा.संचालक, डॉ. बिपिनचंद्र वाडेकर यांना पुढील ठराव मांडण्यास सांगितले.

विषय क्र. 4 : आर्थिक वर्ष 2026 - 27 च्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.

मा. संचालक, डॉ. बिपिनचंद्र वाडेकर यांनी विषयास सुरुवात करताना मागील संचालक मंडळाचे आभार मानले व बँकेने 2025-26 करिता ठरविलेल्या सर्व उद्दिष्टांची पूर्तता झाली असल्याचे नमूद केले. त्यानंतर त्यांनी सन 2026-27 करिताचे अंदाजपत्रक सादर केले. एकूण ठेवींचे उद्दिष्ट रु. 3,600/- कोटी व एकूण कर्जाचे उद्दिष्ट रु. 2,400/- कोटी ठेवले असून मिश्र व्यवसाय रु. 394/- कोटीने वाढून रु. 6,000/- कोटी करण्याचे बँकेचे उद्दिष्ट आहे.

ठराव क्र. 4 : संचालक मंडळाने तयार केलेले आर्थिक वर्ष 2026-27 करीताचे अंदाजपत्रक **मा.संचालक, डॉ. बिपिनचंद्र वाडेकर** यांनी सभेपुढे मांडले. त्यास ही सभा मंजुरी देत आहे.

सूचक :	नाव : श्री. फडके नारायण केशवराव	सभासद क्र. 23539
अनुमोदक :	नाव : श्री. भावसार भास्कर काशिनाथ	सभासद क्र. 21698

ठराव सर्वानुमते मंजूर.

त्यानंतर, पुढील विषय म्हणजेच नफा- तोटा वाटणी पत्रक मा. संचालक, श्री. प्रकाश लेले यांनी सभेपुढे मांडला.

विषय क्र. 5 : संचालक मंडळाने सुचवलेल्या सन 2025-26 सालच्या नफा वाटणीस मंजुरी देणे.

यासंदर्भातील ठराव क्र. 5 मांडण्यात आला.

बँकिग क्षेत्रातील तीव्र स्पर्धा, रिझर्व्ह बँकेचे निकष यांची पूर्तता करीत आपली बँक नफा क्षमता टिकवण्यासाठी सतत प्रयत्न करत असते. अहवाल वर्षात बँकेची प्रगती चांगली झाली असून आवश्यक सर्व तरतुदी केल्यानंतर बँकेस रु. 16.64 कोटी इतका निव्वळ नफा झाला आहे.

यासंदर्भात आपल्या वैधानिक लेखापरीक्षकांनी Notes to Accounts अंतर्गत पान क्र. 50 मध्ये सविस्तर टिप्पणी दिली आहे. बँक उत्तरोत्तर चांगली कामगिरी करेल, नफा क्षमता वाढवत ठेवेल आणि सर्वच आर्थिक निकषांबाबत उत्तम कामगिरी करेल याची मला खात्री आहे. सर्व सभासदांना विनंती आहे की संचालक मंडळाने पुढीलप्रमाणे सुचविलेल्या नफा वाटणीस मंजुरी द्यावी.

निव्वळ नफा मागील शिल्लक	16,63,58,958 6,48,08,319
एकूण	**23,11,67,277**
वाटणी राखीव निधी सर्वसाधारण मुक्त निधी लाभांश (2024-25) सभासद कल्याण निधी नॅशनल को-ऑप. शिक्षण निधी सहकारी पुनर्वसन, पुनर्रचना आणि विकास निधी धर्मादाय निधी पुढील वर्षासाठी शिल्लक**	 4,18,00,000 5,97,00,000 3,87,02,224 15,00,000 16,63,590 16,63,590 16,00,000 8,45,37,873
एकूण	**23,11,67,277**

ICAI ने जारी केलेल्या AS-4 या तरतुदीनुसार, आर्थिक वर्ष 2017-18 पासून सर्वसाधारण सभेच्या संमतीने घोषित केलेल्या लाभांशाची गणना ताळेबंदात 'देणे' या अंतर्गत केलेली नाही.

यानंतर, श्री. निलेश सारंग, सभासद क्र. 48183, यांनी प्रश्न विचारला की अन्य बँका 10% ते 15% लाभांश घोषित करत असताना आपली बँक 6% इतका कमी लाभांश का घोषित करत आहे. यापूर्वी आपली बँक देखील जास्त लाभांश देत होती. तसेच, ज्येष्ठांमधील ज्येष्ठ नागरिकांसाठी ठेवींवर अतिरिक्त व्याजदर इतर बँकांप्रमाणे आपल्या बँकेत का दिला जात नाही असा प्रश्न उपस्थित केला.

त्यावर उत्तर देताना मा. अध्यक्षांनी सांगितले की प्रत्येक बँकेची धोरणे वेगळी असतात. आपल्या बँकेने गेल्या दोन वर्षांच्या तुलनेत यावर्षी चांगल्याप्रकारे लाभांश दिला आहे.

सभासद, श्री. विश्वास जोशी यांना त्यांचे मत व्यक्त करायचे होते. परंतु, त्यांचे मत / प्रश्न विषयास अनुसरुन नसल्याने मा. अध्यक्षांनी विषय पूर्ण झाल्यावर बोलण्याची संधी देण्यात येईल असे श्री. जोशी यांना सांगितले.

यानंतर, सभासद, श्री. जगदिश द्विपर यांनी पुढे प्रश्न विचारला की, कमी लाभांशाबाबत विचारले असता अन्य बँकांशी तुलना न करण्याचे सांगितले पण इतर जमा खर्चाचा आढावा घेताना इतर बँकांशी तुलना केली गेली असे का ? लोकांना आणखी उत्तम सेवा देण्यासाठी बँकेने काय प्रयत्न केले ? पुढची GenZ पिढी बँकेशी जोडली जाईल का ? सन 2026-27 चे बँकेने ठेवलेली उद्दिष्टे साध्य होईल का ? याचा बँकेने विचार केला पाहिजे.

यावर मा. अध्यक्षांनी आपल्या सूचनांचा नक्की विचार केला जाईल असे सांगितले.

यानंतर सभासद, श्री. जगदिश द्विपर यांनी त्यांच्या वैयक्तिक गृहकर्जासंदर्भात प्रश्न उपस्थित केले. परंतु, मा. अध्यक्षांनी नफा वाटणी संदर्भातील ठरावास प्रथम मंजुरी घेतली.

नंतर श्री. द्विपर यांनी पुन्हा गृहकर्जासंदर्भातील प्रश्न विचारले. त्यावर उत्तर देताना मा. अध्यक्षांनी सांगितले की प्रश्न व्यक्तिगत स्वरुपाचा असल्याने आपण शाखेत अथवा मुख्य कार्यालयात येऊन भेटावे अन्य सभासदांच्या वैयक्तिक प्रश्नांचे प्रत्यक्ष भेटीत निराकरण केले आहे.

एका मा. सभासदाने प्रश्न उपस्थित केला की, बँकेने 9% लाभांश का दिला नाही.

त्यावर मा. सभासद, श्री. पराग खंडकर यांनी सभेस सांगितले की, संचालक मंडळाने ठरविलेला लाभांश सभेत वाढविता येत नाही. बँकेने पुढील वर्षी याचा विचार करावा. यावर्षीचा जाहीर केलेल्या लाभांशाचा स्वीकार करुया.

ठराव क्र.5: आर्थिक वर्ष 2025-26 करीताचा निव्वळ नफा रु. 16,63,58,958/- झाला आहे. मा. संचालक मंडळाने पुढीलप्रमाणे नफा वाटणीची शिफारस केली आहे. ती **मा.संचालक, श्री. प्रकाश लेले** यांनी सभेसमोर मांडली. सदर नफा वाटणीस ही सभा मंजुरी देत आहे.

निव्वळ नफा	16,63,58,958
मागील शिल्लक	6,48,08,319
एकूण	**23,11,67,277**
वाटणी	
राखीव निधी	4,18,00,000
सर्वसाधारण मुक्त निधी	5,97,00,000
लाभांश (2024-25)	3,87,02,224
सभासद कल्याण निधी	15,00,000
नॅशनल को-ऑप. शिक्षण निधी	16,63,590
सहकारी पुनर्वसन, पुनर्रचना आणि विकास निधी	16,63,590
धर्मादाय निधी	16,00,000
पुढील वर्षासाठी शिल्लक**	8,45,37,873
एकूण	**23,11,67,277**

**ICAI ने AS - 4 दि. 01 एप्रिल, 2017 पासून लागू केले आहे. त्यानुसार बँकेने सन 2025-26 च्या आर्थिक पत्रकात 6% दराने 'प्रस्तावित लाभांश' अंदाजे रु. 6,65,00,000/- देणी या सदरात न दर्शविता, शिल्लक नफ्यामध्ये अंतर्भूत केला आहे. रिझर्व्ह बँकेने मंजूर केलेल्या PNCPS योजनेनुसार (offer document), सन 2025-26 ची लाभांश रक्कम अंदाजे रु. 1,45,000/- 'प्रस्तावित लाभांश' रकमेमध्ये समाविष्ट केली आहे.

सूचक : नाव : श्री. जोशी अविनाश रामचंद्र सभासद क्र. 80566
अनुमोदक : नाव : श्री. बर्वे शेखर सिताराम सभासद क्र. 9485

ठराव सर्वानुमते मंजूर.

त्यानंतर, मा. अध्यक्षांनी पुढील विषय मांडण्यासाठी मा. संचालक, डॉ. चंद्रशेखर तांबडे यांना विनंती केली.

विषय 6 : सन 2025-26 या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरीक्षकांची पुनर्नेमणूक करण्याचा व त्यांचा मेहेनताना ठरविण्याचा अधिकार बँकेच्या संचालक मंडळास देणे.

यासंदर्भातील ठराव क्र. 6 मांडण्यात आला.

ठराव क्र. 6: मल्टीस्टेट सहकारी कायदा 2002 च्या कलम 70 आणि सध्या लागू असलेल्या इतर तरतुदींनुसार, तसेच, बँकिंग नियमन कायदा, 1949 मधील तरतुदींनुसार, सन 2026-27 साठी वैधानिक लेखापरीक्षकांच्या नेमणूकीचा / पुनर्नेमणूकीचा प्रस्ताव रिझर्व्ह बँकेकडे मंजुरीसाठी पाठविण्यात येणार आहे. **मा. संचालक, डॉ. चंद्रशेखर तांबडे** यांनी सदर प्रस्ताव सभेसमोर मांडला. ठराव करण्यात येतो की, रिझर्व्ह बँकेच्या मान्यतेनंतर, सन 2026-27 करिता बँकेच्या वैधानिक

लेखापरीक्षकांची नेमणूक / पुनर्नेमणूक करण्यास तसेच नियमानुसार, त्यांचा मेहेनताना ठरविण्याचे अधिकार ही सभा संचालक मंडळास देत आहे. वैधानिक लेखापरीक्षकांचा नेमणूकीचा कालावधी रिझर्व्ह बँकेच्या मंजुरीच्या तारखेपासून ते पुढील वर्षाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेपर्यंत राहील.

सूचक : नाव : ॲड. ताडमारे समृद्ध प्रदिप सभासद क्र. 79802
अनुमोदक : नाव : श्री. कर्वे उदय मधुसूदन सभासद क्र. 43053
ठराव सर्वानुमते मंजूर.

त्यानंतर, मा. अध्यक्षांनी पुढील विषय मांडण्यासाठी मा.संचालिका, डॉ. अस्मिता मोडक यांना विनंती केली.

विषय क्र.7: संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.

या विषयासंदर्भातील ठराव सादर करताना बँकेच्या मा. संचालिका, डॉ. अस्मिता मोडक यांनी सभेस सांगितले की, संचालक आणि त्यांचे नातेवाईक यांनी स्वत: च्या ठेवीवर रु. 90,000/- कर्ज घेतले होते. त्याची पूर्ण परतफेड झाली असून, दि. 31.03.2026 रोजी कोणतीही शिल्लक नाही. या संदर्भातील ठराव मा. संचालिका, डॉ. अस्मिता मोडक यांनी सभेपुढे मांडला.

ठरावास अनुमोदन देण्यापूर्वी मा. सभासद श्री. विश्वास जोशी यांनी विचारले की पूर्वी बँकेचे संचालक किंवा त्यांचे नातेवाईक कोणतेही कर्ज घेत नाहीत असे अभिमानाने नमूद करत होतो. त्यामुळे सदरचे रु. 90,000/- कर्ज चुकीचे आहे असे मत त्यांनी व्यक्त केले.

त्यांच्या प्रश्नास उत्तर देताना मा. अध्यक्ष, ॲड. सौ. संपदा कुळकर्णी यांनी सांगितले की संचालकांना त्यांच्या मुदत ठेवीवर कर्ज देण्याची तरतूद आहे आणि बँक अन्य कुठल्याही प्रकारचे कर्ज संचालकांना देत नाही. सदर कर्जाची मार्च अखेरपर्यंत परतफेड झाली असून आता कोणतीही शिल्लक नाही.

त्यानंतर, यासंदर्भातील ठराव क्र. 7 मांडण्यात आला.

ठराव क्र. 7 : संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाबाबतचा ठराव **मा.संचालिका, डॉ. अस्मिता मोडक** यांनी सभेपुढे मांडला.

सन 2025-26 या आर्थिक वर्षात संचालक व त्यांचे नातेवाईक यांनी आपल्या बँकेच्या ठेवीवर रु. 90,000/- कर्ज घेतले होते. त्या कर्जाची पूर्ण परतफेड देखील झाली असून, दि. 31.03.2026 अखेर सदर कर्जाची शिल्लक नाही, याची ही सभा नोंद घेत आहे.

सूचक : नाव : सीए प्राची सुधाकर कुलकर्णी सभासद क्र. 80280
अनुमोदक : नाव : श्री. पाटील मच्छिंद्रनाथ महारु सभासद क्र. 82838
ठराव सर्वानुमते मंजूर.

त्यानंतर, पुढील विषय मांडण्यासाठी मा. अध्यक्षांनी, मा.संचालक, श्री. सुशीलकुमार मुळ्ये यांना सांगितले.

विषय क्र. 8 : बँकेच्या पुढील वर्षाकरीताच्या तसेच दीर्घकालीन व्यवसाय आराखडयास मंजुरी देणे.

बँकेचे मा. **संचालक, श्री. सुशीलकुमार मुळ्ये** यांनी दीर्घकालीन व्यवसाय आराखडा सभेपुढे मांडला. ठराव मांडताना श्री. मुळ्ये सर यांनी सभेस सांगितले की बँकेने मार्च 2026 करिता जी उद्दिष्टे ठेवली होती ती सर्व साध्य केली आहेत. त्यानंतर त्यांनी मार्च 2027-2031 करिताचा दीर्घकालीन व्यवसाय आराखडा सभेपुढे सादर केला. सदर आराखडा खालीलप्रमाणे :

(रु. कोटी)

तपशील	2026	2031
मिश्र व्यवसाय	5,606	7,975
निव्वळ नफा	16.64	29.95
CRAR	13.34%	Above 13%
ढोबळ अनुत्पादित कर्जे	5.64%	4.25%
निव्वळ अनुत्पादित कर्जे	2.22%	0.49%
NPA Provision Coverage Ratio	60.68%	88.88%

वरील उद्दिष्टे गाठण्याबरोबरच बँक खालील गोष्टींवर सुद्धा लक्ष केंद्रित करणार असल्याचे त्यांनी सभेस सांगितले.

- बँकेची ECBA वर्गवारी राखणे.
- शाखांची संख्या वाढविणे. त्यामुळे बँकेचा विस्तार होईल व व्यवसायामध्ये वृद्धी होईल.
- तंत्रज्ञानात सुधारणा करणे. बँकेने आता TCS C-Edge कंपनीबरोबर करार करुन त्यांचे सीबीएस सॉफ्टवेअर घेण्याचे ठरवले आहे. ते लवकरात लवकर कार्यान्वित होत आहे.
- बँक काही नवीन meger आणि acquisition साठी प्रयत्न करणार आहे. जेणेकरुन व्यवसायामध्ये वृद्धी होईल.

सर्व सभासदांना श्री. मुळ्ये यांनी व्यवसाय आराखडयास मंजुरी देण्याची विनंती केली व ठराव सभेपुढे सादर केला.

त्यानंतर, यासंदर्भातील ठराव क्र. 8 मांडण्यात आला

ठराव क्र. 8 : **मा.संचालक, श्री. सुशीलकुमार मुळ्ये** यांनी संचालक मंडळाने शिफारस केलेला पुढील वर्षांकरीताचा दीर्घकालीन व्यवसाय आराखडा (2026 - 2031) सभेपुढे मांडला. त्यास ही सभा मंजुरी देत आहे.

सूचक : नाव : सौ. अस्मिता आनंद गोडबोले सभासद क्र. 18925
अनुमोदक : नाव : श्री. मांडे अनिरुद्ध भगवंत सभासद क्र. 10828

ठराव सर्वानुमते मंजूर.

त्यानंतर, पुढील विषय मांडण्यासाठी मा. अध्यक्षांनी, मा. संचालक, श्री. प्रविण गमरे यांना सांगितले.

विषय क्र. 9 : या सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सर्व सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.

बँकेचे मा. संचालक, श्री. प्रविण गमरे यांनी हा ठराव सभेपुढे मांडला. ठराव मांडताना श्री. गमरे सर यांनी सांगितले की बँकेचे सध्या एकूण 68755 सभासद असून बँकेच्या महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये शाखा आहेत. सर्व सभासदांना सभेस उपस्थित राहणे शक्य होत नाही म्हणून त्यांची अनुपस्थिती ही सभा क्षमापित करीत आहे.

त्यानंतर, यासंदर्भातील ठराव क्र. 9 मांडण्यात आला.

ठराव क्र.9 : या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सर्व सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करण्याचा ठराव **मा. संचालक, श्री. प्रविण गमरे** यांनी सभेपुढे मांडला.

या सभेस अनुपस्थित असलेल्या सर्व सभासदांची अनुपस्थिती ही सभा क्षमापित करीत आहे.

सूचक : नाव : श्री. पवार नरेंद बाबूराव सभासद क्र. 17425
अनुमोदक : नाव : डॉ. फाटक रत्नाकर नारायण सभासद क्र. 10294
ठराव सर्वानुमते मंजूर.

त्यानंतर, मा. अध्यक्षांनी, मा. उपाध्यक्ष, श्री. महेश देशपांडे यांना विषय पत्रिकेतील सर्व विषय झाल्याने आभार प्रदर्शन करण्याची विनंती केली.

मा. उपाध्यक्ष, श्री. महेश देशपांडे यांनी सभेकरिता उपस्थित सर्व सभासदांचे आभार मानले. बँकेचे सर्व खातेदार, ठेवीदार, बँकेचे सर्व हितचिंतक, उपस्थित माजी संचालक या सर्वांचे संचालक मंडळ आभारी आहे. सर्व संस्थापक संचालक, सदस्य यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. सभेत मंजूर केलेल्या ठरावांकरिता सूचक, अनुमोदक यांचे आभार मानले. बँकेचे वैधानिक लेखापरीक्षक, मे. मुकुंद एम. चितळे ॲण्ड कं. व मुख्य अंतर्गत लेखापरीक्षक, मे. किर्तने अँड पंडित यांचे आभार मानले. बँकेच्या बोर्ड ऑफ मॅनेजमेंटवर असलेले सदस्य, रिझर्व्ह बँकेचे निवृत्त अधिकारी, श्री. विवेक घळसासी, श्री. मधुकर खरे, श्री. राजेश घारपुरे यांचे मोलाचे मार्गदर्शन बँकेला मिळते, त्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त केले. बँकेच्या वार्षिक अहवालाच्या छपाईचे काम करणा-या प्रिंटींग प्रेस, नवरंग बॅन्क्वेट हॉलचे मालक व व्यवस्थापक, सभेच्या कामकाजाचे चित्रिकरण करणारे छायाचित्रकार, श्री. श्रीनिवास लेले, सिक्युरिटी गार्डस्, अनंत हलवाई या सर्वांना धन्यवाद दिले. बँकेच्या कर्मचारी संघटना व अधिकारी असोसिएशन तसेच, ज्या कर्मचा-यांनी सभा यशस्वी करण्याकरिता मेहनत घेतली त्यांच्याप्रती आभार व्यक्त केले.

यानंतर, मा. अध्यक्षांनी सभेची सांगता झाल्याचे जाहीर केले.

व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी **अध्यक्ष**